| MHAU100010112025 | नियमित दिवाणी दावा/**96/2025**<br><br>**जिजाबाई आसाराम बोंबले वि.. एकनाथ किसन दांगोर्डे** |
|---|---|

## निशाणी ०५ खालील आदेश

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे मौजे वडोद खुर्द ता. खुलताबाद जि. छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) येथील गट नं./सर्वे नं.४०/२, एकुण क्षेत्र २ हेक्टर ८९ आर पैकी, वादी व प्रतिवादी १ व २ यांची वडीलोपार्जित शेतजमीन १ हेक्टर ३ आर (यानंतर सदर जमिनीला 'वाद मिळकत' असे संबोधले आहे.) प्रतिवादीने हे त्रयस्थ व्यक्तींना विक्री करु नये. करीता तात्पुरता प्रतिबंध करण्यासाठी तुर्तातुर्त मनाई हुकूमाकरिता दाखल केला आहे.

## प्रतिदाव्यातील वादीचे थोडक्यात कथन की :-

०२. वादी यांनी असे कथन केले की, वादी ही प्रतिवादी क्र. १ व २ यांची सख्खी बहीण आहे. वादमिळकत ही वादी व प्रतिवादी क्र.१ ते २ यांचे वडील यांना वारसाने वाटणीने आलेली मिळकत असून सदर वादमिळकत ही वडीलोपार्जित मिळकत आहे. वादमिळकती मध्ये वाटणी झालेली नाही. प्रतिवादी क्र.१ व २ हे वादमिळकतीवर वहीती करतात. प्रत्येक हंगामाचा वहितीचा माल वादीच्या वाटणी हिश्यानुसार वादीला देतात. वादीने मे-२०२५ मधे वादमिळकत मध्ये असलेल्या हिस्सा सरस-निरस मानाने १/३ वाटुन द्यावा असे विनंती केली असता प्रतिवादींनी हिससा देण्यात टाळाटाळ करुन उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच वादीचा हिस्सा न देता प्रतिवादी क्र. १ व २ ने ४० आर शेतजमीन प्रतिवादी क्र.३ ला विक्री केली. प्रतिवादी क्र.३ने ती जमीन प्रतिवादी क्र.४ ला विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र.४ ने प्रतिवादी क्र. ५ ला २०-आर जमीन विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. ४ ने प्रतिवादी क्र.६ ला २०-आर जमीन विक्री केली. तसेच प्रतिवादी क्र. ५-१ व ५-३ यांनी प्रतिवादी क्र.७ ला २०- आर जमीन विक्री केली. प्रतिवादी हे वादीचा हिस्सा डावलण्याचा प्रयत्न करीत असल्याने सदरील अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. याउलट, प्रतिवादी क्र.२ ने अर्जास लेखी म्हणणे दाखल करुन वादीचा अर्ज मान्य

केला.

०४. प्रतिवादी क्र.७ ने सदरील अर्जास लेखी म्हणणे दाखल करुन सदरील अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली. त्यामध्ये असे कथन केले की, प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या व्यतिरिक्त वादीस दगडु किसन दांगोर्डे हा भाऊ आहे व त्यास दाव्यात सामील केलेले नाही. तसेच वादीने प्रतिवादी क्र.१ व २ यांना गट नं. ४२/३ मधे एक हेक्टर पाच आर व गट नं. ४५/३ मधे प्रतिवादी क्र. १ व २ यांना दोन हेक्टर दहा आर व गट नं. ४६/२-क या गटामधे प्रतिवादी क्र. १ व २ यांना ३५- आर क्षेत्र हक्कनोंदपत्रात आहेत. परंतु या तिनही मिळकती वादीने दाव्यात समाविष्ट केल्या नसल्याने वादीचा दावा फेटाळण्याची विनंती केली.

०५. प्रतिवादी क्र. ७ ने पुढे कथन केले की, वादीने प्रतिवादी क्र.२ याच्याशी संगणमत करुन सदरील दावा दाखल केला. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी गट नं. ४०/२ मधील २०-आर व ४०-आर क्षेत्र रामदास सोनवणे याला विक्री केले परंतु त्यास आवश्यक पक्षकार म्हणुन दाव्यात सामील केलेले नाही. प्रतिवादी हा दावा मिळकतीतील २०-क्षेत्राचा कायदेशिर मालक आहे. करीता सदरील अर्ज नामंदजुर करण्याची विनंती केली.

०६. वादीतर्फे ॲड. श्री. एस.बी.पुरी यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र. ७ तर्फे ॲड.श्री. यु.एल जाधव यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. खालील मुद्दे माझ्या पडताळणीस उपस्थित झाले असून त्यावरील निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | सकृतदर्शनीय प्रकरण वादीच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| २ | वादीचे कधीही न भरुण येणारे नुकसान होणार आहे का ? | नाही. |
| ३ | तुलनात्मक दृष्ट्या दावा वादीच्या बाजुने आहे का ? | नाही. |
| ४ | काय वादी तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यास पात्र आहेत ? | नाही. |
| ५ | काय हुकूम ? | अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्रमांक १ ते ३ करिता</u> -**

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडित असल्याने त्यांची पुनरावृत्ती टाळण्याकरिता सर्व मुद्दे एकत्रीत चर्चेला घेतले आहे).

०८. वादी यांनी वादमिळकत ही वडीलोपार्जित मिळकत असल्याचे कथन करुन वादमिळकतीमध्ये सरस निरस मानाने वाटणी झाली नसुन त्यामध्ये वादीचा हिस्सा असल्याचे कथन केले. तसेच प्रतिवादींनी वादमिळकत ही इतर त्रयस्थ व्यक्तींना हस्तांतरण करुन नये करीता सदरील अर्ज मंजुर करण्याची विनंती केली. वादीने वादमिळकतीचा ७/१२ अभिलेखावर दाखल केला. त्यामध्ये वादमिळकत ही प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या ताब्यात असल्याचे दिसुन येते. त्यानंतर वादीने खरेदीखत व फेरफार यांच्या प्रती दाखल केल्या. त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ याने प्रतिवादी क्र. ३ याला वादमिळकतीतील ४०-आर जमीन विकल्याचे दिसुन येते. तसेच प्रतिवादी क्र. ३ शेख शब्बीर याने प्रतिवादी क्र. ४ याला खरेदीने ४०- आर जमीन विक्री केल्याबाबतचे खरेदीखत दाखल केले. तसेच प्रतिवादी क्र. ४ ने प्रतिवादी क्र. ५ ला ४०-आर जमीन विक्री केल्याबाबतचे खरेदीखत दाखल केले. वादीने दाखल केलेले दस्त पाहिले असता वादमिळकत ही प्रथम दर्शनी वादी व प्रतिवादी क्र. १ व २ यांचे वडील किसन लक्ष्मण दांगोर्डे यांच्या नावावर असल्याबाबतचा कोणताही दस्त दाखल केल्याचे दिसुन येत नाही.

०९. याउलट प्रतिवादी क्र.७ ने असे कथन केले की, वादमिळकतीतील २०- आर क्षेत्र प्रतिवादी क्र. ५ कडून नोंदणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतले. वादीने सदरील खरेदीखत दाव्यासोबत दाखल केले. सदर दाव्यामध्ये वादीने वादमिळकत ही वडीलोपार्जित मिळकत असल्याचे कथन केले. परंतु त्याबाबतचा कोणताही दस्त सद्य स्थितीत अभिलेखावर दाखल केला नाही. याउलट, प्रतिवादीने खरेदीखतानुसार जमीन विकत घेतल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. त्यामुळे वादीने केलेले कथन हे सद्यपरीस्थीतीत पुराव्याविना मंजुर करता येणार नाही. प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे वादमिळकतीतील काही क्षेत्र हे नोंदणीकृत खरेदीखता प्रमाणे विकत घेतलेले असल्याचे कथन केले असल्याने व त्याबाबत नोंदणीकृत खरेदीखत अभिलेखावर दाखल असल्याने सदरील अर्ज वादीने प्रथम दर्शनी सिध्द केल्याचे दिसुन येत नाही. अर्जातील समतोल हा प्रतिवादीच्या बाजुने प्रथम दर्शनी असल्याचे दिसुन येते. सदरील वादमिळकतीतील क्षेत्र प्रतिवादींनी नोंदवणीकृत खरेदीखताआधारे विकत घेतल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत असलयाचे प्रतिवादींचे न भरुन निघणारे नुकसान वादीच्या तुलनेत जास्त दिसुन येते. म्हणुन मुद्दा क्र. १ ते

३ चे उत्तर  नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दे क्रमांक ४  करिता</u> -**

**१०.** मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तरावरुन  वादीने  प्रतिवादी विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूमास आवश्यक असलेले घटक तिच्या बाजुने सिध्द केल्याचे स्पष्ट होत नाही.  म्हणुन प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज  त्यांचे विरुध्द मंजुर होण्यास पात्र नाही. म्हणुन मुद्दा क्र. ४ ला नकारार्थी उत्तर नोंदवित आहे व मुद्दा क्र. ५ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.03.13 12:21:06 +0530

दि. १२/०३/२०२६. **(जी.डी. गुरनुले)**

सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

खुलताबाद.

## CERTIFICATE

I am affirm that the contents of this PDF file order are same, word to word, as per the original order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : N.D.Narwade |
| Court | : Court no. 02, Khultabad. |
| Date of the order | : 12/03.2026. |
| Order signed by the presiding officer on | : 12/03.2026. |
| Order uploaded on | : 13/03.2026. |

..........